आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. २०२९-३० पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत जाईल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं विधानसभेत प्रतिपादन.

2. नागपूर इथं सुरू असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा आज समारोप: पुढील अधिवेशन 23 फेब्रुवारीपासून मुंबईत.

3. फक्त मुंबई महानगरपालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून या अधिवेशनात सत्ताधाऱ्यांनी निर्णय घेतल्याची विरोधी पक्षांची टीका.

4. संत्रा रोपवाटिका सक्षम होण्याच्या दृष्टीनं राज्य सरकार अध्यादेश काढणार- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले निर्देश.

5. भारत आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघादरम्यानचा तिसरा टी-ट्वेंटी सामना आज धर्मशाला इथं होणार.

<u>अंतिम आठवडा प्रस्ताव मुख्यमंत्री /उपमुख्यमंत्री</u>

रिझर्व्ह बँकेनं घालून दिलेल्या मर्यादेच्या आतच महाराष्ट्र सरकारनं कर्ज घेतलं असून राजकोषीय तूट तीन टक्क्याच्या आत ठेवण्यात यश आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावरल्या चर्चेला उत्तर देताना ते विधानसभेत बोलत होते. चालू आर्थिक वर्षातही राजकोषीय तूट तीन टक्क्याच्या आत ठेवण्यात यश येईल, असा विश्वास व्यक्त करत, राज्य दिवाळखोरीकडे जात नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. देशातल्या मोठ्या राज्यांचा विचार केला असता महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आजही सर्व निकषांवर पात्र ठरणारी आहे, असं सांगून २०२९-३० पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत जाईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

*आता आपण महाराष्ट्र एक व्हिजन डॉक्युमेंट तयार केलेला आहे आणि या व्हिजन डॉक्युमेंट मध्ये 2047 चा विकसित महाराष्ट्र कसा असेल, यासंदर्भातलं प्रत्येक विभागाच्या रोडमॅप तयार केला. या तीन टप्पे आपण केले. 2030 चा पहिला टप्पा, 2035 चा दुसरा टप्पा आणि 2047 चा तिसरा टप्पा आणि मला विश्वास आहे की 2029-30 च्या दरम्यान देशातली पहिली ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी ही महाराष्ट्र असेल.*

2023 मध्ये संत्र्याची निर्यात मंदावल्यामुळे दिलेल्या सबसिडीचे 169 कोटी रु. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनाच मिळणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. दरम्यान, विधान परिषदेत अंतिम आठवडा चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं की, मुंबईतील ओसी नसलेल्या सुमारे २० हजार इमारतींना सरकारनं दिलासा दिला आहे. या निर्णयाचा फायदा अडीच लाखांपेक्षा जास्त कुटुंबांना आणि १० लाखांहून अधिक नागरिकांना होणार आहे. नवी मुंबईत घर घेणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून सिडकोच्या घरांच्या किंमतीत थेट १० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वीजनिर्मिती, खनिजसंपत्ती, कृषी, वनसंपत्ती, पर्यटन, वाहतूक आणि लॉजिस्टिक ही विदर्भाची सात मुख्य बलस्थानं आहेत, असं सांगतांना गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त भागाचं रूपांतर देशाच्या 'स्टील हब'मध्ये करण्याचा आणि मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद संपुष्टात आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. चीननंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी 'फ्लाइंग अकादमी' अमरावतीमध्ये सुरू होणार असून इथं २५ हजार वैमानिकांना प्रशिक्षण देण्यासाठी एअर इंडियासोबत करार करण्यात आला आहे. अमरावतीच्या पीएम मित्रा पार्कमुळे दोन लाख रोजगार आणि निर्यातीच्या संधी उपलब्ध होतील, तर नांदगाव पेठ इथं टेक्सटाईल क्लस्टरच्या मेगा प्रोजेक्टला मंजुरी देण्यात आली आहे. सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी २ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पामुळे विदर्भातील १० लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. गोसीखुर्द प्रकल्प आणि पूर्व विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठीही मोठा निधी देण्यात आला आहे. नागपूरला आंतरराष्ट्रीय व्यवसाय आणि वित्तीय केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी हिंगणा तालुक्यात १ हजार ७१० एकरांवर प्रकल्प उभारला जात आहे. महाज्योतीचं मुख्यालय नागपुरात स्थलांतरित केलं जात असून १०० एकर जागेवर 'स्किल डेव्हलपमेंट युनिव्हर्सिटी' स्थापन होणार आहे, अशी माहिती शिंदे यांनी दिली.

विधान सभा कामकाज

राज्याची उपराजधानी नागपूर इथं गेल्या आठ डिसेंबरपासून सुरू झालेल्या राज्य विधिमंडळाच्या सात दिवसीय अधिवेशनाचा आज समारोप झाला. पुढील अधिवेशन पुढच्या वर्षी २३ फेब्रुवारीपासून मुंबईत होणार असल्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष मिलिंद नार्वेकर यांनी सभागृहात केली. विधानसभेत एकूण सात बैठका झाल्या. प्रत्यक्षात 72 तास 35 मिनिटं कामकाज झालं आणि 16 शासकीय विधेयकं संमत करण्यात आली, अशी माहिती त्यांनी दिली. दरम्यान, आज विधानसभेची नियमित बैठक सुरू

झाल्यावर प्रश्नोत्तराच्या तासात कॉंग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी विद्यार्थ्यांचा प्रश्न मांडला. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या महाज्योतीमार्फत स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण योजना राबवण्यात येते. आता ही योजना ऑनलाइन राबवण्यात येणार आहे. जी संस्था हे काम करणार आहे, ती राजस्थानची आहे. त्याऐवजी हे प्रशिक्षण ऑफलाईन देण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण ऑनलाइन देण्यात येणार असल्यामुळे त्यांना त्यांचं विद्यावेतन मिळालेलं नाही. या विद्यार्थ्यांनी काल आंदोलनही केलं असल्याचं त्यांनी सांगितलं. लोकसंख्येच्या हिशोबानं महाज्योतीला अधिकचा निधी द्यावा, अशी मागणीही वडेट्टीवार यांनी यावेळी केली. यावर उत्तर देताना मंत्री अतुल सावे यांनी ऑफलाईन प्रशिक्षणाची मागणी असेल, तर ते ऑफलाईनही देण्यात येईल, हे स्पष्ट केलं. निधी कमी दिला, या मुद्द्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की ज्या विभागाला कमी निधी देण्यात आला आहे, याबाबत अर्थमंत्री अजित पवार यांच्या बरोबर बैठक झाली आहे. मार्चमधील पुरवणी मागण्या आणि अर्थसंकल्पात याची तरतूद करण्यात येईल, असं आश्वासन दिलं. मंत्री मंगलप्रभात लोढा यांनीही या प्रशिक्षणार्थींना नवीन योजनेत सामावून घेतलं जाईल आणि याबाबत नवीन धोरण आखण्यात येईल, असं आश्वासन आज सभागृहात दिलं. बुलढाणा जिल्ह्यातील सारंगवाडी जलसंधारण प्रकल्पाच्या खर्चवाढीबाबत आणि संभाव्य अनियमिततेबाबत विशेष तपास पथक (एसआयटी) नेमून तीन महिन्यांत चौकशी केली जाईल तसंच दोषी आढळणाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली. राज्यात स्मार्ट मीटर बसवण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत घेण्यात आला आहे. सामान्य घरगुती ग्राहकांना प्रीपेड मीटर लावले जाणार नाहीत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितलं. प्रश्नोत्तराच्या तासात विधानसभा सदस्य भास्कर जाधव आणि रईस शेख यांच्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. सुरुवातीला प्रत्येक ग्राहकाला प्रीपेड स्मार्ट मीटर लावण्याचा प्रस्ताव होता. मात्र, त्यावर मोठ्या प्रमाणात आक्षेप नोंदवण्यात आल्यानं राज्य शासनानं टप्प्याटप्प्यानं अंमलबजावणीचा निर्णय घेतला. पहिल्या टप्प्यात फिडर मीटर आणि डिस्ट्रीब्युशन मीटर बसवण्यात आले असून, सध्या शासकीय कार्यालयं आणि आस्थापनांमध्येच प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. सामान्य ग्राहकांसाठी मात्र पोस्टपेड स्मार्ट मीटरच बसवले जात आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

## विरोधी पक्ष पत्रकार परिषद

नागपूर इथं सात दिवसाचं हिवाळी अधिवेशन पार पडलं. पण या अधिवेशनातून शेतकऱ्यांना तसंच विदर्भातील जनतेला काहीच मिळालं नाही. फक्त मुंबई महानगरपालिका निवडणुका डोळयासमोर ठेवून या अधिवेशनात सत्ताधाऱ्यांनी निर्णय घेतले. त्यामुळे या अधिवेशनाची फलश्रुती शून्य असल्याची टीका विरोधी पक्षानं केली. अधिवेशन संपल्यावर विरोधकांची संयुक्त पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते भास्कर जाधव म्हणाले की निवडणुकीत सरकारी तिजोरीतून पैसे खर्च करण्यासाठी अधिवेशन झालं. सरकारकडून ज्या काही घोषणा झाल्या, त्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई यासाठी झाल्या; पण विदर्भासाठी एकही घोषणा करण्यात आली नाही. त्यामुळे विदर्भातील जनतेची फसवणूक करणारं हे अधिवेशन होतं. विदर्भातील धान, सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी या अधिवेशनाकडे डोळे लावून बसला होता. धानाला आणि सोयाबीनला बोनस मिळावा म्हणून आम्ही मागणी केली; पण सरकारनं कारवाई केली नाही, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

*काय आमच्या मागण्या होत्या त्या वाटाण्याच्या अक्षता घातल्या मुख्य म्हणजे आमच्यापेक्षा विदर्भाच्या विकासासाठी विदर्भाच्या जनतेला जे आवश्यक आहे ते मागील आम्ही धान उत्पादक शेतकऱ्याला ₹20,000 बोनस मागितला. त्याचा कुठेही पत्ता नव्हता. आम्ही सोयाबीनच्या शेतकऱ्यांसाठी ₹2000 प्रति क्विंटल बोनस मागितला त्याचाही कुठे त्यांनी उल्लेख केलेला नाही. आणि विशेष म्हणजे विदर्भामध्ये संत्रा मोसंबीला मार्केट नाही. त्यावर ते कुठे उल्लेख केलेला नाही. त्यांना मार्केटची हमी आणि बांगलादेशमध्ये जो आपला संत्रा जातो त्यावर जे काही निर्यात ड्यूटी लावली आहे त्यावर आपला संत्रा मार्केट मिळत नाही. त्याच्यावर कुठलेही भाष्य केले नाही.*

## विधान परिषद कामकाज

आज विधान परिषदेत नियमित कामकाज चालू झाल्यानंतर सदस्य ज.मो. अभ्यंकर यांनी रात्रशाळांच्या समस्यांबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली. यावर उत्तर देतांना राज्यात सध्या १४९ रात्रशाळा सुरू आहेत. या शाळांबाबतच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करून धोरण ठरवण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली.अमरावती शहरातील वाहतुकीसाठी राजकमल रेल्वे उड्डाणपूल हा महत्वाचा पूल आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या या पुलाचं आयुष्यमान संपल्यानं या पुलाची पुनर्बांधणी करणे प्रस्तावित आहे. या उड्डाण पुलाच्या पुनर्बांधणीसाठी

१२५ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या कामासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात निधीची तरतूद केली जाईल, असं सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितलं. दरम्यान, आजचं कामकाज संपल्यावर सभापती राम शिंदे यांनी विधान परिषदेचं कामकाज संस्थगित करण्याची घोषणा केली. परिषदेत एकूण 48 तास 16 मिनिटं कामकाज झालं असून 4 शासकीय विधेयकं संमत करण्यात आली, तर विधानसभेनं संमत केलेली 14 विधेयकं विधानपरिषदेत संमत करण्यात आली असल्याचंही त्यांनी सांगितलं.

<u>बैठक संत्रा पीक</u>

संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना उत्तम आणि दर्जेदार रोपं मिळावीत, यासाठी नर्सरी अर्थात रोपवाटिका सक्षम व्हाव्यात, या दृष्टीनं प्रयत्न करण्यात येत आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात विदर्भातील शेतकरी तसंच ॲग्रोव्हिजन समितीकडून आलेल्या सूचनांचं स्वागत करून सर्वसमावेशक असा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना बळ देणारा नर्सरी कायदा अस्तित्वात यावा, यादृष्टीनं सकारात्मक निर्णय घेऊन लवकरच या संबंधित अध्यादेश काढण्याच्या सूचना राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज दिल्या.

<u>क्रिकेट</u>

क्रिकेट! भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान सुरू असलेल्या टी-२० क्रिकेट मालिकेतील तिसरा सामना आज हिमाचल प्रदेशच्या धर्मशाला इथं खेळवला जाणार आहे.

<u>आशिया कप क्रिकेट</u>

२०२५ च्या १९ वर्षांखालील आशिया कपमध्ये, दुबई इथल्या आयसीसी अकादमी मैदानावर भारत आणि पाकिस्तान दरम्यान सामना सुरू आहे. पावसामुळे सामना ४९ षटकांचा करण्यात आला आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणारा भारताचा संघ ४६ षटकं आणि एका चेंडूत २४० धावांवर सर्वबाद झाला. भारताकडून ॲरॉन जॉर्जनं सर्वाधिक ८५ धावा केल्या. अखेरचं वृत्त हाती आलं, तेव्हा भारतानं दिलेल्या २४१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, पाकिस्तानच्या ३५ षटकांत ६ गडी बाद १२५ धावा झाल्या होत्या.

*****